SAGE | bhasha

भारतीय भाषा प्रकाशन प्रकल्प

# शैक्षणिक संसाधन

## मराठी पुस्तक सूची

2020-2021

www.sagebhasha.com

प्रिय ग्राहक,

मराठी भाषेतील आमच्या नवीन आणि प्रचंड खपाच्या पुस्तकांचा मौल्यवान ठेवा या समग्र पुस्तकसूचीच्या (कॅटलॉग) माध्यमातून आपल्यापर्यंत पोहोचविणे हे सेज भाषा मराठी पुस्तकसूचीचे उद्दिष्ट आहे.

आम्ही आमच्या वाचकांसाठी सामाजिक शास्त्राच्या क्षेत्रातील अतुलनीय साधनसंपत्ती उपलब्ध करून देत आहोत. यामध्ये संशोधन पद्धती, राजकारण, समाजशास्त्र, इतिहास, शासन, मानसशास्त्र, शिक्षण, अर्थशास्त्र व विकास अभ्यास आणि शैक्षणिक साधने या विषयांचा समावेश आहे.

एकाच क्षेत्रातील विद्यार्थी आणि संशोधकांसाठी उद्‌बोधक विषयांतील अधिकारपूर्ण, आंतरविद्याशाखीय आणि उत्कृष्ट दर्जाचे साहित्य पुरविण्याचे उद्दिष्ट असलेली आमची पुस्तकसूची म्हणजे तुमच्या सर्व शैक्षणिक गरजा एकाच ठिकाणी पूर्ण करणारी सूची आहे.

आमच्या सेज भाषा ग्रंथनामांची संपूर्ण श्रेणी पाहण्यासाठी **www.sagebhasha.com** ला भेट द्या. आमच्या विशेष शिफारशींसाठी किंवा निवडीतील मदतीसाठी **bhashasales@sagepub.in** येथे आमच्याशी विनासंकोच संपर्क साधा.

सेजची नवीन आणि आगामी ग्रंथनामे किंवा सेजमधील घडामोडींची माहिती घेत रहा! आमच्याशी येथे संपर्क साधा **marketing@sagepub.in**

आपल्या मौल्यवान सहयोगासाठी उत्सुक!

आपले विश्वासू

सेज मार्केटिंग

## अनुक्रमणिका


सामाजिक शास्त्रे ................................ 1–4

इतिहास ................................ 4–5

माध्यमे आणि संप्रेषण ................................ 5–6

अर्थशास्त्र आणि वैकासिक अभ्यास ................ 6–8

कायदा आणि फौजदारी न्याय ................ 8

शांतता आणि संघर्ष अभ्यास ................ 8–9

नीती अभ्यास ................................ 9

राजकारण आणि आंतरराष्ट्रीय संबंध .......... 9–11

संशोधन पद्धती ................................ 12–14

समाजकार्य ................................ 14

नागरी अभ्यास ................................ 15

नीतिमूल्ये ................................ 15


# आमची अमूल्य पुस्तके
























अपनी पांडुलिपि भेजने के लिए **sagebhasha@sagepub.in** को लिखें

₹ 475

# अटलांटिक गांधी




हिंदीमध्ये उपलब्ध

### सागरापार महात्मा

अटलांटिक गांधी: सागरापार महात्मा हे पुस्तक विदेशी स्थलांतर, उत्तर वासाहतिक संभाषण सिद्धान्त आणि प्रतिकारात्मक अभ्यासातील अलीकडचे अटलांटिक वळण यांच्या चौकटीतून गांधींचा भारतीय वसाहत ते दक्षिण आफ्रिकेतील मळे आणि खाणी इथवरच्या प्रवासातील अनुभव समोर आणण्याचा प्रयत्न करते.

### लेखिकेविषयी

**नलिनी नटराजन** या सध्या मानवविज्ञान महाविद्यालय, पोर्टो रीको विद्यापीठ, येथे इंग्रजी विभागात प्राध्यापिका आहेत.

**2019 • 272 pages • PB (978-93-532-8237-0)**

₹ 250

# आरएसएस, शालेय पाठ्यपुस्तके आणि महात्मा गांधींची हत्या



हिंदीमध्ये उपलब्ध

### हिंदू सांप्रदायिक प्रकल्प

या पुस्तकातून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शालेय पुस्तकांचे स्वरूप, महात्मा गांधींची हत्या आणि सावरकर व गोळवलकर यांनी पुरस्कृत केलेली हिंदू सांप्रदायिक विचारधारा या तिन्ही घटकांचा सखोल अभ्यास करून त्यांच्यातील परस्परसंबंध स्पष्ट केला आहे.

### लेखकांविषयी

**आदित्य मुखर्जी,** प्राध्यापक, ऐतिहासिक अभ्यास केंद्र, जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, नवी दिल्ली
**मृदुला मुखर्जी** जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, नवी दिल्ली, भारत
**सुचेता महाजन** जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, नवी दिल्ली, भारत

**2018 • 124 pages • PB (978-93-528-0834-2)**

₹ 475

# अस्मिता आणि धर्म




हिंदीमध्ये उपलब्ध

### भारतातील इस्लामविरोधाचे मूलाधार

हिंदू-मुस्लीम यांच्यामध्ये अनेक शतके घनिष्ठ परस्परसंबंध असूनही बहुतांश हिंदू हे त्यांच्या इतिहासातील इस्लामी कालखंडाविषयी अस्वस्थ होतात.या अस्वस्थतेमागील कारणे शोधण्याचा प्रयत्न करत असताना प्रस्तुत पुस्तक, सातत्याने हिंदूंच्या मनामध्ये मुस्लिमांविषयी असलेल्या या अढीचा संबंध भारतीय राष्ट्रवादी परंपरेत असलेल्या पूर्वग्रहाशी जोडता येईल, असा प्रतिवाद करते.

### लेखकाविषयी

**अमलेन्दु मिश्रा** हे लॅन्केस्टर विद्यापीठ, यु.के. येथे राज्यशास्त्र, तत्त्वज्ञान आणि धर्म विभागात ज्येष्ठ प्राध्यापक आहेत. तसेच लिस्बन विद्यापीठ, पोर्तुगाल येथे कला शाखेत संशोधन प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

**2019 • 288 pages • PB (978-93-532-8246-2)**

₹ 495

# जातिव्यवस्थेची नवी समीक्षा




हिंदीमध्ये उपलब्ध

### पवित्रतेकडून अपवित्रतेकडे

जातिव्यवस्थेची नवी समीक्षा: पवित्रतेकडून अपवित्रतेकडे हे पुस्तक जातिव्यवस्थेतील आर्थिक, राजकीय आणि वैचारिक घटकांच्या आंतरक्षेत्राचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून अभ्यास करते. मुख्य प्रवाहातील समाजशास्त्रज्ञ हे जातिव्यवस्थेच्या आचारपद्धतीतील एकजिनसीपणावरच लक्ष केंद्रित करत असल्याने आंतरजातीय असमानतेकडे दुर्लक्ष होत असलेले दिसून येते. अशा स्वरूपाच्या कृतीवरून भारतात जातीविषयक जाणिवा या वर्ग जाणिवांपेक्षा वरचढ असतात हा गैरसमज दूर होतो.

### लेखकाविषयी

**हीरा सिंह** हे यॉर्क विद्यापीठ, टोरांटो येथे समाजशास्त्राचे अध्यापन करतात.

**2019 • 308 pages • PB (978-93-532-8473-2)**

₹ 645

# भारतातील समाज




भारतातील समाज: भारतीय समाजाचे हे व्यापक विश्लेषण, या समाजातील गुंतागुंत समजून घेण्यासाठी करण्यात आलेल्या आधुनिक संशोधनाचा परिपाक आहे. या आवृत्तीमध्ये दोन खंडांचा समावेश आहे. खंड एक सातत्य आणि बदल, सामाजिक व्यवस्था, जातिव्यवस्थेचा आढावा घेतो. तर खंड दोन सामाजिक बदलांवर भाष्य करतो.

### लेखकाविषयी

**डेव्हिड जी. मंडेलबाउम** (१९११-१९८७) हे बर्कले येथील कॅलिफोर्निया विद्यापीठात मानववंशशास्त्राचे प्राध्यापक होते. भारतात १९३७ मध्ये प्रत्यक्ष फील्डवर काम केलेले ते पहिले अमेरिकी मानववंशशास्त्रज्ञ होते.

**2019 • 472 pages • PB (978-93-532-8545-6)**

₹ 545

# भगवे ध्वज आणि गोल टोप्या




हिंदीमध्ये उपलब्ध

### हिंदुत्व, मुस्लीम अस्मिता आणि भारत नावाची कल्पना

हिंदुत्ववादी विचारधारा कशा प्रकारे वाढत जाऊन मुस्लीम समुदाय आपल्या अस्तित्वाचेच आव्हान पेलत आहे आणि त्याच वेळी, आपल्या शब्दांद्वारे तृणमूल पातळीवर धीरोदात्तपणे बदल घडवणारे इस्लामचे अभ्यासक आणि अध्यापक फरहात हाश्मी यांचे विचारमंथन अनुभवत आहे. या सर्व आव्हानांच्या गदारोळात, भारताचे कल्पनाचित्रही अडचणीत सापडले आहे, आणि हे राष्ट्र योग्य दिशेच्या शोधात आहे.

### लेखकाविषयी

**ज़ियाउस्सलाम** हे नावाजलेले वाङ्मयीन आणि सामाजिक समीक्षक आहेत. ते सध्या फ्रंटलाईनचे सहयोगी संपादक आहेत.

**2019 • 240 pages • PB (978-93-532-8593-7)**

₹ 595

# परिकल्पित हिंदुवाद




हिंदीमध्ये उपलब्ध

### ब्रिटिश प्रोटेस्टंट मिशनरीकृत हिंदुवादाची रचिते, 1793–1900

प्रस्तुत पुस्तक अठराव्या शतकाचा उत्तरार्ध आणि एकोणिसावे शतक यादरम्यान ब्रिटिश प्रोटेस्टंट धर्मप्रचारकांनी हिंदुवाद ही संकल्पना विकसित केली, तिचा उगम आणि कालक्रमानुसार या संकल्पनेची येत गेलेली स्पष्टता याचा शोध घेत, तो सर्व पट उलगडून दाखवणारा महत्त्वपूर्ण ऐवज आहे.

### लेखकाविषयी

**जेफ्री ए. ऑडी** सिडनी विद्यापीठातील इतिहास विभागामध्ये मानद ज्येष्ठ व्याख्याते आहेत.

**2019 • 396 pages • PB (978-93-532-8610-1)**

₹ 495

# दलितांचे सशक्तीकरण




हिंदीमध्ये उपलब्ध

### आर्थिक आणि सामाजिक दरी सांधण्याचे आव्हान

भारतीय समाजातील मूळचे रहिवासी असलेल्या आणि वगळणूक झालेल्या गटांच्या वगळणुकीशी संबंधित वंचिततेची संकल्पना आणि सामाजिक वगळणुकीचा सर्वसाधारण अर्थ व संकल्पना उलगडून सांगते; तसेच जातीय अस्पृश्यता व वांशिकता यांच्यावर आधारित वगळणुकीचा अर्थ व संकल्पना विशेषत्वाने स्पष्ट करते

### संपादकांविषयी

**सुखदेव थोरात**, (पीएच.डी.) हे इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च (आयसीएसएसआर)चे अध्यक्ष आहेत.

**निधी सदाना सभरवाल,** (पीएच.डी.) या सध्या नवी दिल्लीतील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ दलित स्टडीज (आयआयडीएस) या संस्थेच्या संचालक आहेत.

**2019 • 340 pages • PB (978-93-532-8624-8)**

₹ 350

# भारतातील सामाजिक चळवळी, 2e




हिंदीमध्ये उपलब्ध

### एक साहित्यिक परामर्श

सामाजिक चळवळी सहसा असंघटित असल्या, तरी काहीतरी सामूहिक राजकीय भूमिका घेऊन राजकीय आणि/किंवा सामाजिक बदलांसाठी सतत प्रयत्नशील असतात. भारतात अशा चळवळींची परंपरा कित्येक शतकांची असली, तरी त्यांचा सखोल अभ्यास अलीकडेच सुरू झालेला दिसतो. अशाच एका समृद्ध पुस्तकाची ही पूर्णतया सुधारित आवृत्ती भारतात १८५७ पासून सुरू झालेल्या सामाजिक चळवळींशी संबंधित साहित्याची साक्षेपी समीक्षा आणि विश्लेषण करते.

### लेखकाविषयी

**घनश्याम शाह** इन्स्टिट्युट ऑफ ॲडव्हान्स्ड स्टडी इन ह्युमॅनिटीज ॲंड सोशल सायन्सेस, वासेनार, नेदरलॅंड्स

**2017 • 288 pages • PB (978-93-859-8536-2)**

₹ 250

# अमूल्य कन्यारत्ने




हिंदीमध्ये उपलब्ध

### पहिल्या पिढीतील स्वावलंबी महिला

अमूल्य कन्यारत्ने हे पुस्तक शहरी भागांतील युवतींच्या करिअरविषयक महत्त्वाकांक्षांचा वेध घेते. या मुली उच्च शिक्षणासाठी, नोकऱ्यांसाठी घराची चौकट ओलांडून बाह्यविश्वात येतात तेव्हा अनेक दूरगामी बदल घडवू लागतात. या बदलांचा किंवा संक्रमणांचा—लोकसंख्यात्मक, शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक—अभ्यास हा या पुस्तकाचा गाभा आहे.

### लेखिकेविषयी

**ॲलिस डब्ल्यू. क्लार्क** या इतिहासकार असून, भारतात लिंगभेद आणि समाज या विषयांचा त्यांचा अभ्यास आहे. कॅलिफोर्निया-बर्कले विद्यापीठ विस्तार विभागाच्या त्या माजी निदेशक आहेत.

**2018 • 204 pages • PB (978-93-528-0415-3)**

₹ 350

# भारतीय समाजशास्त्र



### समस्या आणि आव्हाने

'भारतीय समाजशास्त्राचा अभ्यास' या खंडात आलेले निबंध हे एकेकट्याने किंवा सामूहिक स्वरूपात भारतीय समाजाच्या व समाजशास्त्र अभ्यासाच्या एक किंवा अनेक पैलूंचे विश्लेषण करतात. त्या दृष्टीने हा खंड म्हणजे खरोखरीच भारतीय समाजशास्त्राविषयीचा शोधकदीप ठरतो. तसेच, भारतीय समाजशास्त्रज्ञांना आत्मनिरीक्षणासाठी प्रवृत्त करतो. भारतीय समाजशास्त्र संस्थेच्या (आयएसएस) अधिकृत मुखपत्रातून प्रस्तुत निबंधांची काळजीपूर्वक निवड प्रा. एल. थारा भाई यांनी केली आहे.

### संपादिकेविषयी

**एल. थारा. भाई** या मदुराई कामराज विद्यापीठात समाजशास्त्र विभागात वरिष्ठ प्राध्यापक आणि विभागप्रमुख होत्या.

**2017 • 312 pages • PB (978-93-859-8537-9)**

₹ 250

# मातृत्वाबद्दलच्या शंकाकुशंका



मातृत्वाबद्दलच्या शंकाकुशंका हे स्त्रीवादाचे सैद्धान्तीकरण या मालिकेतले चौथे पुस्तक आहे. भारतीय समाजाच्या आकलनासाठी मातृत्वाविषयीचे आकलन अत्यावश्यक आहे, या मुद्द्यावर या पुस्तकाचा भर आहे. भारत जागतिक भांडवली व्यवस्थेचा घटक बनल्यापासून मातृत्वाच्या संकल्पनेत आणि आचरणात बदल झालेला दिसून येतो. या पुस्तकात मातृत्वाचे एक विचारधारा म्हणून आणि एक आचरण म्हणून विश्लेषण करण्यात आले आहे.

### लेखिकेविषयी

**यशोधरा बागची** (१९३७–२०१५) या जादवपूर विद्यापीठात महिला अभ्यास विषयाच्या गुणश्री प्राध्यापक होत्या. पश्चिम बंगाल महिला आयोगाच्या अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे.

**2018 • 128 pages • PB (978-93-528-0424-5)**

₹ 475

# भारतातील दलित समाज




हिंदीमध्ये उपलब्ध

### सामूहिक विधिलिखिताच्या शोधात

दलितांचे सध्याचे देशातील आणि राज्यागणिक स्थान यांचा सविस्तर आढावा हे पुस्तक घेते. यासाठी मानवी विकास, सामाजिक आणि आर्थिक अशा विविध निर्देशांकांचा आधार घेते. मुख्य प्रवाहापासून दूर ठेवण्यासाठी दलितांबरोबर कशा प्रकारे भेदभाव केला जातो याचेही सप्रमाण आणि सोदाहरण विवेचन या पुस्तकात मांडण्यात आले आहे.

### लेखकाविषयी

**सुखदेव थोरात,** (पीएच.डी.) हे इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च (आयसीएसएसआर)चे अध्यक्ष आहेत.

**2017 • 374 pages • PB (978-93-859-8532-4)**

₹ 450

# भारतातील बौद्धधम्म




हिंदीमध्ये उपलब्ध

### ब्राह्मणीधर्म व जातीयतेला आव्हान

भारतातील बौद्धधम्म, ब्राह्मणवाद आणि जातियतेच्या २५०० वर्षांच्या प्रवासाचा रंजक शोध हे पुस्तक घेते. डॉ. गेल ऑम्वेट बौद्धधम्माचा ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय आणि तात्त्विक अंगांनी धांडोळा समर्थपणे घेतात.

### लेखिकेविषयी

**गेल ऑम्वेट** या मुक्त लेखिका आणि विकास सल्लागार आहेत. दलित, जातिविरोधी, शेतकरी, पर्यावरण आणि विशेषतः ग्रामीण महिलांशी संबंधित विविध चळवळींमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग राहिला.

**2016 • 404 pages • PB (978-93-515-0713-0)**

₹ 395

# हिंदुत्व-मुक्त भारत



हिंदीमध्ये उपलब्ध

### दलित-बहुजन, सामाजिक-आध्यात्मिक आणि वैज्ञानिक क्रांतीवरील चिंतन

'व्हाय आय ॲम नॉट अ हिंदू' या प्रचंड गाजलेल्या पुस्तकाचे लेखक कांचा अइलैय्या यांच्या सिद्धहस्त लेखणीतून उतरलेल्या या आणखी एका विचारप्रवर्तक पुस्तकातून ते ब्राह्मणवादाची आणि भारतातील जातिव्यवस्थेची सखोल चिकित्सा करतात. अ-वैज्ञानिक आणि अ-राष्ट्रीय भूमिकांमुळे हिंदुत्ववादाचा लवकरच ऱ्हास होईल, असे भाकीतही ते वर्तवतात.

### लेखकाविषयी

**कांचा अइलैय्या,** एक तळमळीचे सामाजिक कार्यकर्ते आणि लेखक असून उस्मानिया विद्यापीठात राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.

**2017 • 336 pages • PB (978-93-859-8543-0)**

₹ 425

# गांधी आणि अली बंधू




हिंदीमध्ये उपलब्ध

### एका मैत्रीची चरित्र

हे पुस्तक म्हणजे १९१९ ते १९३१ यादरम्यान गांधी व अली बंधू यांच्यातील नात्याचा असहकार – खिलाफत चळवळींच्या संदर्भातून घेतलेला परामर्श आहे. गांधींचा खिलाफत आंदोलनातील सहभाग हा एका मुस्लीम प्रश्नाचे राष्ट्रीय प्रश्नात रूपांतर करण्याच्या उपक्रमातील पहिलाच थेट सहभाग होता.

### लेखकाविषयी

**राखहरि चटर्जी** राज्यशास्त्रातील यु.जी.सी मानद सदस्य, कलकत्ता विद्यापीठ, कोलकाता.

**2018 • 228 pages • PB (978-93-528-0844-1)**

₹ 345

# वस्त्राद्वारे स्वातंत्र्यप्राप्ती




हिंदीमध्ये उपलब्ध

### गांधीप्रणीत स्वदेशी क्रांतीमधील आवाहनाची मीमांसा

महात्मा गांधी यांनी स्वदेशी पेहरावाच्या वापराच्या प्रभावी संदेशातून ३० कोटी भारतीय ज्यात सहभागी झाले अशी अभूतपूर्व क्रांती कशी घडवली याचा शोध प्रस्तुत ग्रंथातून घेण्यात आला आहे. स्वदेशी वस्त्रांच्या वापरातून दास्यमुक्ती मिळवण्याच्या गांधींच्या वैशिष्ट्यपूर्ण धोरणावर लेखकाने प्रकाश टाकला आहे.

### लेखकाविषयी

**पीटर गोंसाल्विस,** पीएच.डी. हे, सॅलेशिअन पॉंटीफिकल युनिव्हर्सिटी, रोम येथे सामाजिक संप्रेषण शास्त्राचे अध्यापक आहेत.

**2018 • 216 pages • PB (978-93-528-0783-3)**

₹ 350

# बोस बंधू आणि भारतीय स्वातंत्र्य




हिंदीमध्ये उपलब्ध

### मर्मबंधातल्या आठवणी

शरदचंद्र आणि सुभाषचंद्र या बोस बंधूंच्या भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील भूमिकांचा धांडोळा हे पुस्तक घेते. बोस कुटुंबातीलच अमियनाथ यांच्या प्रत्यक्षदर्शी कथनातून या आठवणी सरकत राहतात. अमियनाथ हे शरदचंद्रांचे चिरंजीव आणि सुभाषचंद्रांचे पुतणे. पण त्यापलीकडे ते या दोघांचे राजकीय समर्थक आणि विश्वासू दूतही होते.

### लेखिकेविषयी

**माधुरी बोस** यांचा जन्म आणि बालपण कोलकात्यातले. अमियनाथ आणि ज्योत्स्ना बोस यांचे त्या दुसरे अपत्य, शरदचंद्र बोस यांच्या नात आणि सुभाषचंद्र बोस यांच्या चुलत नात.

**2017 • 296 pages • PB (978-93-859-8533-1)**

₹ 525

# खादी




हिंदीमध्ये उपलब्ध

### गांधींच्या क्रांतीचे महाप्रतीक

वस्त्राद्वारे एकता, सक्षमीकरण आणि दास्यमुक्ती या रूपकांच्या अभ्यासाच्या माध्यमातून एका प्रतीकाची संपूर्ण समाजात गुणात्मक परिवर्तन घडवून आणण्याची ताकद याचा शोध घेताना हे पुस्तक बहुआयामी परिप्रेक्ष्यातून अतिशय बारकाईने पेहरावाच्या संवादशैलीत दडलेले साम्राज्यसत्तेच्या उलथापालथीचे परीक्षण करते.

### लेखकाविषयी

**पीटर गोंसाल्विस,** पीएच.डी. हे, सॅलेशिअन पॉंटीफिकल युनिव्हर्सिटी, रोम येथे सामाजिक संप्रेषण शास्त्राचे अध्यापक आहेत.

**2019 • 324 pages • PB (978-93-532-8209-7)**

₹ 895

# इंडिया कनेक्टेड




हिंदीमध्ये उपलब्ध

### नव माध्यमांच्या प्रभावाचे समीक्षण

नव माध्यमे सामाजिक चळवळी उभारण्यात योगदान देऊ शकतात का? नव माध्यमांच्या चौकटीतून कोण वगळले गेले आहे? सर्वसाधारण जनमानसाच्या वर्तुळावर याचा काय परिणाम होतो? आणि नव माध्यमांवर कशा प्रकारे अंकुश ठेवता येऊ शकतो? या प्रश्नांची उत्तरे देताना हे पुस्तक भारतातील नव माध्यमांच्या वाढीचे समीक्षात्मक परीक्षण करते.

### संपादकांविषयी

**सुनेत्रा सेन नारायण** या भारतीय जनसंपर्क संस्था (आयआयएमसी) नवी दिल्ली येथे असोसिएट प्रोफेसर आहेत. **शालिनी नारायणन** या कम्युनिकेशन्स कन्सलटंट असून त्या भारतीय जनसंपर्क संस्था (आयआयएमसी), नवी दिल्ली येथे असोसिएट प्रोफेसर होत्या.

**2019 • 336 pages • PB (978-93-532-8265-3)**

₹ 645




हिंदीमध्ये उपलब्ध

## माहिती अधिकारातून पत्रकारिता

### माहिती, तपास, परिणाम

माहिती अधिकारातून पत्रकारिता हे पुस्तक माहिती अधिकार कायद्याचे शोध पत्रकारितेला होणारे साहाय्य अधोरेखित करते. तसेच कथानकाच्या माध्यमातून, लेखकाने चिकाटीचे प्रयत्न करून माहिती अधिकार कायद्याचा वापर करून बातम्या गोळा करणे, योग्य परिणामांवर लक्ष केंद्रित करून पाठपुरावा घेणे यांवर प्रकाश टाकत लेखकाचे स्वानुभव वाचकांसमोर उलगडते.

### लेखकाविषयी

**श्यामलाल यादव** हे इंडियन एक्स्प्रेस, नवी दिल्ली येथे वरिष्ठ संपादक असून ते त्यांच्या शोधपत्रकारितेसाठी जागतिक स्तरावर सुपरिचित आहेत.

**2019 • 256 pages • PB (978-93-532-8479-4)**

₹ 375




## विकासाच्या अभ्यासाची तोंडओळख

विकास अभ्यासाची तोंडओळख हे पुस्तक विकासाच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि प्रशासकीय पार्श्वभूमींचा एकत्रित व समतोल आढावा घेते. सैद्धान्तिक आणि प्रायोगिक आयामांचे विश्लेषण करते. विकास म्हणजे निव्वळ आर्थिक वृद्धी नव्हे, हे वास्तव लेखक अनेक विकसनशील देशांमधील विद्यमान आणि गतकाळातील उदाहरणे मांडून सप्रमाण दाखवून देतात.

### लेखकाविषयी

**बी. के. पटनाईक,** प्राध्यापक, स्कूल ऑफ एक्स्टेन्शन अँड डेव्हलपमेंट स्टडीज, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ (IGNOU), नवी दिल्ली.

**2018 • 300 pages • PB (978-93-528-0421-4)**

₹ 575




हिंदीमध्ये उपलब्ध

## भारतीय अर्थव्यवस्थेची संक्रमणावस्था

### सी.टी. कुरियन यांच्या सन्मानार्थ निबंध

भारताच्या आर्थिक वृद्धीच्या प्रक्रियेचे सुयोग्यरीत्या दस्तऐवजीकरण झालेले असले तरीही सर्वसामान्य आणि क्षेत्रीय संदर्भातून संक्रमणावस्थेदरम्यान आणि नंतर निर्माण झालेल्या समस्या आणि परिणाम हे धोरणकर्त्यांसाठी प्रमुख चिंतेचे विषय ठरलेले आहेत. सी.टी. कुरियन यांच्या सन्मानार्थ प्रकाशित केलेला हा खंड भारताच्या गेल्या दीड दशकातील वृद्धीच्या कामगिरीचे आणि परिणामांचे गुणवत्तापूर्ण मूल्यांकन करतो.

### संपादकांविषयी

**एस. जनकराजन** हे सध्या साउथ एशिया कॉन्सॉर्टियम फॉर इंटरडिसिप्लिनरी वॉटर रिसोर्सेस स्टडीज, हैदराबादचे अध्यक्ष आहेत.

**एल. वेंकटाचलम** हे एमआयडीएस, चेन्नई येथे प्राध्यापक आहेत.

**आर. मरिया सलेथ** हे सध्या मद्रास स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथे मानद प्राध्यापक आहेत.

**2019 • 376 pages • PB (978-93-532-8204-2)**

₹ 465




## सूक्ष्म अर्थशास्त्राचा सिद्धान्त

'सूक्ष्म अर्थशास्त्राचा सिद्धान्त' हे पुस्तक विविध महत्त्वाच्या विषयांवर विस्तृत चर्चा घडवून आणते. उदा. ग्राहक सिद्धान्त उपयोजन आणि विस्तार; व्यवसाय संस्था सिद्धान्त; उत्पादन, मूल्य आणि पुरवठा; सार्वत्रिक आणि आंशिक समतोल; कल्याण अर्थशास्त्र; माहिती आणि अशाश्वतता; बाजारपेठ अपरिपूर्णता आणि खेळ सिद्धान्ताचे समग्र पुनरावलोकन.

### लेखकाविषयी

**पंकज टण्डन,** बॉस्टन विद्यापीठ, बॉस्टन.

**2018 • 364 pages • PB (978-93-528-0418-4)**

₹ 695

# दैनंदिन व्यवहारासाठी अर्थशास्त्र




हिंदीमध्ये उपलब्ध

### विकास क्षेत्रातील अभ्यासकांसाठी सुलभ मार्गदर्शक

हे पुस्तक म्हणजे विकासाच्या अभ्यासकांसाठी आणि नागरी-सामाजिक कार्यकर्त्यांसाठी ज्यांनी या विषयाचे कुठलेही औपचारिक शिक्षण घेतलेले नाही, अशांसाठी अर्थशास्त्राचा सर्वसमावेशक सारांश आहे. या पुस्तकातून स्वतंत्र प्रकरणांच्या माध्यमाद्वारे दारिद्र्य, असमानता, सामाजिक आणि लिंग भेद आणि पर्यावरणीय प्रभाव या महत्त्वाच्या प्रश्नांचा मागोवा घेतला आहे.

**लेखकाविषयी**

**वी. शांताकुमार** सध्या अझीम प्रेमजी विद्यापीठ, बेंगळुरू येथे प्राध्यापक आहेत.

**2019 • 292 pages • PB (978-93-532-8476-3)**

₹ 395

# भारतीय अर्थव्यवस्था




### स्थूल अर्थशास्त्रीय आढावा

भारतीय स्थूल अर्थव्यवस्थेचा थोडक्यात परंतु सुबोध आढावा घेणारे हे पुस्तक आर्थिक वृद्धी आणि स्थैर्याच्या दृष्टीने अत्यावश्यक असलेली सरकारी धोरणे आणि उपायांची समीक्षा करते. भारतीय संदर्भांचा आधार घेत सविस्तर केस स्टडीज, आकृत्या आणि कोष्टके, उदाहरणे यांच्या साह्याने हे पुस्तक आर्थिक सिद्धान्तांची वास्तव अर्थव्यवस्थेशी सांगड घालते.

**लेखकाविषयी**

**नीलांजन बानीक** सहयोगी प्राध्यापक, महिंद्रा एकोले सेन्ट्राले, हैदराबाद

**2017 • 288 pages • PB (978-93-859-8535-5)**

₹ 445

# गांधीप्रणीत अर्थशास्त्राच्या पलीकडे




### एक सर्जनशील भंजन

गांधीप्रणीत अर्थशास्त्राच्या पलीकडे हे पुस्तक गांधीप्रणीत अर्थशास्त्र नवअभिजात धाटणीचे नाही, हे प्रस्थापित करण्याचा प्रयत्न आहे. प्रस्तुत पुस्तक गांधीप्रणीत अर्थशास्त्राची सीमा ओलांडून गांधींनी अनेक प्रश्नांचा परामर्श घेतला असा दावा करते. आतापर्यंत अनभिज्ञ असलेल्या गांधीप्रणीत राजकीय आर्थिक सिद्धान्ताचा समंजसपणे मागोवा घेते.

**लेखकाविषयी**

**बी. एन. घोष,** हे लीड्स कॉलेज ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड टेक्नॉलॉजी, युके, इस्टर्न मेडिटेरेनियन युनिव्हर्सिटी, सायप्रस, युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स, पेनांग (मलेशिया) आणि झीजियांग गोंगशांग युनिव्हर्सिटी, चीन येथे अभ्यागत प्राध्यापक म्हणून कार्यरत होते.

**2019 • 248 pages • PB (978-93-532-8527-2)**

₹ 495

# ग्रामीण विकास, 4e




हिंदीमध्ये उपलब्ध

### तत्त्वे, धोरणे आणि व्यवस्थापन

'ग्रामीण विकास' हे भारतात ग्रामीण विकास आणि व्यवस्थापनाच्या क्षेत्रातील विविध धोरणे, नीती आणि कार्यक्रम यांची दखल घेणारे या विषयावरील एकमेवाद्वितीय पाठ्यपुस्तक आहे. ग्रामीण विकासाची मूलभूत संकल्पना, धोरण संसाधने, नीती, धोरणे, कार्यक्रम आणि व्यवस्थापनाविषयी सर्वंकष माहिती देणारे हे काळाच्या कसोटीवर उतरलेले असे पाठ्यपुस्तक आहे.

**लेखकांविषयी**

**कटार सिंह,** माजी संचालक, इन्स्टिट्युट ऑफ रुरल मॅनेजमेंट, आणंद (आयआरएमए), गुजरात.

**अनिल शिशोदिया,** इन्फर्मेशम/रेफरन्स सर्विसेस डिपार्टमेंट ऑफ द कॅलगरी पब्लिक लायब्ररी, कॅलगरी, कॅनडा.

**2017 • 396 pages • PB (978-93-528-0022-3)**

₹ 495

# पर्यावरणीय अर्थशास्त्र




हिंदीमध्ये उपलब्ध

## सिद्धान्त आणि उपयोजन

पर्यावरणीय अर्थशास्त्र: सिद्धान्त आणि उपयोजन म्हणजे पर्यावरणीय अर्थशास्त्राचा सखोल अभ्यास असून; सामूहिक कृती, पर्यावरण धोरण आणि व्यवस्थापनाविषयी सिद्धान्तांवर यात विशेष भर आहे. सिद्धान्त आणि सराव यांचा समतोल मेळ असलेल्या या पुस्तकात पर्यावरणीय अर्थशास्त्रातील अनेक मूलभूत संकल्पना, साधने, तंत्रे यांची ओळख करून देण्यात आली आहे.

### लेखकांविषयी

**कटार सिंह,** माजी संचालक, इन्स्टिट्युट ऑफ रुरल मॅनेजमेंट, आणंद (आयआरएमए), गुजरात.
**अनिल शिशोदिया,** इन्फर्मेशम/रेफरन्स सर्विसेस डिपार्टमेंट ऑफ द कॅलगरी पब्लिक लायब्ररी, कॅलगरी, कॅनडा.

**2017 • 408 pages • PB (978-93-528-0397-2)**

₹ 495

# भारतातील महिलांविरुद्धचे सायबर गुन्हे




हिंदीमध्ये उपलब्ध

हे पुस्तक किशोरवयीन मुली आणि महिलांना लक्ष्य करणाऱ्या ऑनलाईन गुन्ह्यांवरील सामाजिक-कायदेशीर संशोधनातील एक महत्त्वाचे योगदान ठरले आहे. मुली किंवा महिला या ट्रोलिंग, ऑनलाईन ग्रूमिंग, गोपनीयतेचा भंग, छळवणूक, अश्लील साहित्य, लैंगिक बदनामी, मॉर्फिंग, स्पूफिंग आणि अशाच गुन्ह्यांच्या सहज लक्ष्य कशा बनतात हे प्रस्तुत पुस्तकातून दर्शवले आहे.

### लेखकांविषयी

**देबारती हालदर** या युनायटेड स्कूल ऑफ लॉ, अहमदाबाद, गुजरात येथे कायदेविषयक अभ्यासाच्या प्राध्यापिका असून सायबर पीडित समुपदेशन केंद्र, भारत च्या (मानद) व्यवस्थापकीय संचालक आहेत.
**के. जयशंकर** हे रक्षा शक्ती विद्यापीठ (पोलीस आणि अंतर्गत सुरक्षा विद्यापीठ)अहमदाबाद, गुजरात, भारत येथे गुन्हाशास्त्र विभागाचे प्राध्यापक आणि प्रमुख आहेत.

**2019 • 284 pages • PB (978-93-532-8470-1)**

₹ 375

# विकासाचे अर्थशास्त्र




हिंदीमध्ये उपलब्ध

## सर्वसमावेशक वृद्धीच्या दिशेने

विकासाचे अर्थशास्त्र: सर्वसमावेशक वृद्धीच्या दिशेने हे पुस्तक अशी भूमिका मांडते, की वृद्धी, उत्पन्नाचे वितरण आणि गरिबी निर्मूलनावर स्वतंत्रपणे लक्ष केंद्रित करण्याऐवजी विकास धोरणांचे मूलभूत उद्दिष्ट सर्वसमावेशक वृद्धी हे असले पाहिजे. विकासाच्या मुद्द्यांकडे हे पुस्तक तुलनात्मक दृष्टिकोनातून पाहते, तसेच विकसनशील देशांनी राबवलेल्या यशस्वी आणि अयशस्वी धोरणांचा धांडोळा घेऊन त्यांचे विश्लेषण करते.

### लेखकाविषयी

**सय्यद नवाब हैदर नक्वी,** एचईसी डिस्टिंग्विश्ड नॅशनल प्रोफेसर, फेडरल उर्दू युनिव्हर्सिटी ऑफ आर्ट्स, सायन्स अँड टेक्नॉलॉजी, इस्लामाबाद.

**2017 • 292 pages • PB (978-93-528-0400-9)**

₹ 545

# जागतिक जिहाद आणि अमेरिका




हिंदीमध्ये उपलब्ध

## इराक आणि अफगाणिस्तान पलीकडील शंभर वर्षांचे युद्ध

जागतिक जिहाद पौर्वात्य आणि पाश्चिमात्य आधुनिक मानवी संस्कृतीसमोरील सर्वांत मोठा धोका आहे, या गृहीतकावर हा अभ्यास प्रश्नचिन्ह उपस्थित करत पाश्चिमात्य आणि इस्लामिक संस्कृती परस्परांशी विसंगत असून त्या अनिश्चित काळापर्यंत एकमेकांशी झुंजत राहणार, हेच दैवाने लिहिले असेल, तर तो एका वेगळ्या संशोधनाचा विषय आहे असा दृष्टिकोन हे पुस्तक बाळगते.

### लेखकाविषयी

**ताज हाश्मी** हे इतिहास आणि सुरक्षा अभ्यासाचे निवृत्त प्राध्यापक आहेत.

**2019 • 368 pages • PB (978-93-532-8241-7)**

₹ 400

## ऑपरेशन ब्लॅक थंडर




### पंजाबमधील दहशतवादाचा प्रत्यक्षदर्शी लेखाजोखा

पंजाबमधील सुप्रसिद्ध 'ऑपरेशन ब्लॅक थंडर' ही कारवाई सुरू करण्यात आणि राबवण्यात, अमृतसरचे तत्कालीन उपायुक्त सरब जित सिंग यांचा महत्त्वाचा वाटा होता. त्यांच्याच लेखणीतून या कारवाईचा थरारक लेखाजोखा या पुस्तकाच्या रूपात वाचकांसमोर येतो. ऑपरेशन ब्लू स्टारमुळे पंजाबमधील दहशतवाद उग्र बनला. पण ऑपरेशन ब्लॅक थंडरमुळे या दहशतवादाला पायबंद बसला.

**लेखकाविषयी**

**सरब जित सिंग,** आयएएस (निवृत्त) हे १९८७ ते १९९२ या काळात अमृतसरचे उपायुक्त होते. त्यांना १९८९मध्ये पद्मश्रीने सन्मानित केले गेले.

**2017 • 344 pages • PB (978-93-866-0271-8)**

₹ 595

## जागतिकीकरणातील लोकप्रशासन




हिंदीमध्ये उपलब्ध

### सिद्धान्त आणि व्यवहार

जागतिकीकरणाच्या आजच्या युगात लोकप्रशासनाच्या क्षेत्रात होत असलेल्या घडामोडींचा सारांशात्मक आढावा 'जागतिकीकरणातील लोकप्रशासन' हे पुस्तक घेते. शासन पद्धती समजून घेण्यासाठी आवश्यक महत्त्वाच्या पैलूंचा घेतलेला मागोवा हे या पुस्तकाचे बलस्थान आहे. हे करत असतानाच, जगभरात एकूणच समाज आणि प्रशासन प्रणालींमध्ये होत असलेल्या संक्रमणाची दखलही हे पुस्तक घेते.

**लेखकांविषयी**

**बिद्युत चक्रवर्ती,** प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, दिल्ली विद्यापीठ.
**प्रकाश चंद,** सहायक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, दयाल सिंह (ई) महाविद्यालय, दिल्ली विद्यापीठ.

**2018 • 544 pages • PB (978-93-515-0705-5)**

₹ 495

## भारतातील लोकसंख्याविषयक समस्या




हिंदीमध्ये उपलब्ध

### बदलते कल, धोरणे आणि कृतिकार्यक्रम

वाढती लोकसंख्या ही कोणत्याही देशाची राज्यव्यवस्था आणि विकास यांना भेडसावणारी समस्या असते. भारतातील धार्मिक विविधता आणि विविध सामाजिक स्तर लक्षात घेता ही समस्या ठळकपणे जाणवते. भारतातील लोकसंख्याविषयक समस्या: बदलते कल, धोरणे आणि कृतिकार्यक्रम हे पुस्तक स्वातंत्र्योत्तर कालखंडात सात दशके ही समस्या या देशाने कशा प्रकारे हाताळली याचे विश्लेषण करते.

**लेखकाविषयी**

**कृष्णमूर्ती श्रीनिवासन** हे बेंगळुरू येथील इन्स्टिट्यूट फॉर सोशल ॲण्ड इकॉनॉमिक चेंज येथे मानद प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

**2019 • 336 pages • PB (978-93-532-8596-8)**

₹ 625

## भारतीय प्रशासन




हिंदीमध्ये उपलब्ध

### उत्क्रांती आणि व्यवहार

भारतीय प्रशासन : उत्क्रांती आणि व्यवहार स्वातंत्र्यानंतर झालेल्या भारतीय लोकप्रशासनाच्या वृद्धी आणि विकासाचा परामर्श या क्षेत्रातील नवीन मुद्दे आणि आव्हानांचे सखोल विश्लेषण करते. केवळ भारतीय प्रशासन व्यवस्थेतील संस्थात्मक वैशिष्ट्यांवर भर न देता, हे पुस्तक महत्त्वाच्या मुद्द्यांचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून वेध घेते.

**लेखकांविषयी**

**बिद्युत चक्रवर्ती,** प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, दिल्ली विद्यापीठ.
**प्रकाश चंद,** सहायक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, दयाल सिंह (ई) महाविद्यालय, दिल्ली विद्यापीठ.

**2018 • 368 pages • PB (978-93-532-8111-3)**

₹ 425

# भारतीय युवा आणि निवडणुकीय राजकारण




हिंदीमध्ये उपलब्ध

### एक उदयोन्मुख सहभाग

भारतीय युवा आणि निवडणुकीय राजकारण हे पुस्तक भारतीय युवावर्ग आणि देशातील निवडणुकीय राजकारण यांच्यातील महत्त्वपूर्ण संबंधाचा अभ्यास करते. तसेच राजकीय समस्यांच्या युवावर्गास असलेल्या जाणिवेच्या पातळीचा अभ्यास करत तरुणांचा निवडणुकीय राजकारणाकडे वाढत कल आणि सहभाग यांचे विश्लेषण करते.

### संपादकाविषयी

**संजय कुमार** हे सेंटर फॉर द स्टडी ऑफ डेव्हलपिंग सोसायटीज (सीएसडीएस) चे संचालक आहेत. तसेच ते लोकनीती या सीएसडीएसच्या संशोधन कार्यक्रमाचे सहसंचालक आहेत.

**2019 • 208 pages • PB (978-93-532-8234-9)**

₹ 495

# चीन आणि भारत




हिंदीमध्ये उपलब्ध

### इतिहास, संस्कृती, सहकार्य आणि चढाओढ

चीन आणि भारत यांतील देशांतर्गत विविध उल्लेखनीय प्रश्न आणि त्यांचा निहितार्थ याबाबत विवेचन करण्यासाठी प्रस्तुत उपक्रमामध्ये या दोनही देशांतील अभ्यासक आणि विद्वानांना लिहिते केले आहे. प्रस्तुत लेखनप्रकल्पाचा परिप्रेक्ष्य व्यापक असून त्यामध्ये दोन्ही देशांचा इतिहास, संस्कृती, राजकीय संबंध आणि सध्याच्या व्यापार नीती अंतर्भूत केल्या आहेत.

### संपादकांविषयी

**पारमिता मुखर्जी,** प्राध्यापक, इण्टरनॅशनल मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट (आयएमआय), कोलकाता.
**अर्णब के. देब,** सहयोगी प्राध्यापक, इण्टरनॅशनल मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट, नवी दिल्ली.
**मिआओ पांग,** वरिष्ठ रिसर्च फेलो, इन्स्टिट्यूट ऑफ रुरल इकॉनॉमी अकॅडमी, सिचुआन अकॅडमी ऑफ सोशल सायन्सेस, सिचुआन, चीन.

**2019 • 268 pages • PB (978-93-532-8566-1)**

₹ 375

# भारतातील मतदान वर्तनाचे मापन




हिंदीमध्ये उपलब्ध

प्रस्तुत पुस्तकातून लेखकांनी भारतातील मतदान वर्तन मापनाच्या पद्धतींच्या विविधांगी पैलूंवर प्रकाश टाकत मतदारांची मते, दृष्टिकोन आणि पूर्वग्रह यांच्या मापनाच्या हेतूने उपयोगात आणल्या जाणाऱ्या विविध पद्धतींवर विस्ताराने चर्चा केली आहे. तसेच विभिन्न मतदारांच्या मतदान अनुभवांच्या विविधतेची नोंद करण्याकरता प्रत्येक पद्धतीच्या गुण आणि दोषांची चर्चा केली आहे.

### लेखकांविषयी

**संजय कुमार** हे सेंटर फॉर द स्टडी ऑफ डेव्हलपिंग सोसायटीज (सीएसडीएस) चे संचालक आहेत. तसेच ते लोकनीती या सीएसडीएसच्या संशोधन कार्यक्रमाचे सहसंचालक आहेत.
**प्रवीण राय** हे सेंटर फॉर द स्टडी ऑफ डेव्हलपिंग सोसायटीज, दिल्ली येथे राजकीय विश्लेषक असून त्यांना राजकारण, निवडणुकीय स्पर्धा आणि भारतातील मत सर्वेक्षणं या क्षेत्रांत विशेष रुची आहे.

**2018 • 176 pages • PB (978-93-528-0941-7)**

₹ 395

# भारताच्या परराष्ट्र धोरणाचा पुनर्विचार



हिंदीमध्ये उपलब्ध

### आव्हाने आणि नीती

भारताच्या सध्याच्या परराष्ट्र धोरणातील आव्हानांची व्यूहात्मक आणि धोरणात्मक चिकित्सा हे पुस्तक करते. भारताचे भविष्यकालीन धोरण ठरवू शकतील अशा दीर्घकालीन घटकांचे आणि प्रवाहांचे विश्लेषण यात आढळते. २१व्या शतकातील झपाट्याने बदलत चाललेल्या, व्यामिश्र अशा जगात एक महासत्ता म्हणून उदयाला यायचे असेल, तर भारताला आपल्या परराष्ट्र धोरणांमध्ये आमूलाग्र बदल करावा लागेल, असा इशाराही लेखक देतो.

### लेखकाविषयी

**राजीव सीकरी** यांनी एक मुत्सद्दी म्हणून भारतीय परराष्ट्र सेवेत ३६ वर्षे व्यतीत केली. २००६मध्ये परराष्ट्र मंत्रालयात सचिव म्हणून ते निवृत्त झाले.

**2017 • 312 pages • PB (978-93-515-0715-4)**

₹ 350

# भारताची राज्यघटना, व्यावसायिक नीतिमूल्ये आणि मानवी हक्क



हिंदीमध्ये उपलब्ध

भारताची राज्यघटना, व्यावसायिक नीतिमूल्ये आणि मानवी हक्क हे पुस्तक भारतीय राज्यघटना, मानवी हक्कांशी संबंधित मूलभूत बाबी आणि व्यावसायिक नीतिमूल्यांचे आचरण यांचा सर्वंकष आढावा घेते. हे पाठ्यपुस्तक विविध विषयांचे आकलन सहजसुलभ प्रकारे करून देते. त्याचबरोबर, राज्यघटनेवरील एखाद्या अभ्यासक्रमाचे उद्दिष्ट परिणामकारक आणि योग्यरीत्या गाठण्यातही ते यशस्वी ठरते.

### लेखकाविषयी

**प्रवीणकुमार मेल्लल्ली,** सहायक प्राध्यापक, लोकप्रशासन अभ्यास विभाग, म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर.

**2017 • 220 pages • PB (978-93-866-0203-9)**

₹ 325

# सत्ता संपादन




## भारतातील स्थिती

२०१४मधील लोकसभा निवडणूक राजकीय प्रचाराच्या इतिहासात एक मैलाचा दगड ठरली. 'सत्ता संपादन: भारतातील स्थिती' हे पुस्तक अशा प्रचार मोहिमेचा, व्यूहरचनेचा आढावा घेते; या मोहिमा कशा उभ्या राहतात; व्यक्ती आणि विचारधारा यांचा परस्परांवर काय परिणाम होतो, याचा अभ्यास करते. २०१४ निवडणुकीच्या विश्लेषणात हे पुस्तक महत्त्वपूर्ण योगदान देते.

### लेखकांविषयी

**बिद्युत चक्रवर्ती** हे दिल्ली विद्यापीठात राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.

**सुगातो हाजरा** हे नवी दिल्लीत बिझनेस अँड इमेज मॅनेजमेंट सल्लागार आहेत.

**2018 • 252 pages • PB (978-93-528-0406-1)**

₹ 525

# आधुनिक भारतातील राजकीय विचार



हिंदीमध्ये उपलब्ध

या खंडातील वीस स्फूर्तिदायक आणि अस्सल निबंधांमध्ये प्रमुख आधुनिक भारतीय राजकीय विचारधारांचे समग्र विश्लेषण आढळून येते. आधुनिक भारतीय राजकीय विचारसरणीतील दोन प्रमुख मतप्रवाहांचा परामर्श या निबंधांमध्ये घेण्यात आला आहे—ज्यांनी पाश्चिमात्य राजकीय परंपरा अंगीकारण्यास प्राधान्य दिले असे आणि ज्यांनी स्वदेशीवादावर भर देऊन पर्यायी विचार मांडले असे.

### संपादकांविषयी

**थॉमस पंथम** हे पूर्वी बडोद्याच्या महाराजा सयाजीराव विद्यापीठात प्राध्यापक होते.

**केनेथ डॉयच्च** हे जेनेसिओ येथील न्यूयॉर्क विद्यापीठात राज्यशास्त्राचे प्राध्यापक होते.

**2017 • 420 pages • PB (978-93-515-0711-6)**

₹ 495

# आंतरराष्ट्रीय राजकारण



## संकल्पना, सिद्धान्त आणि समस्या

भारतीय विद्यापीठांमध्ये आंतरराष्ट्रीय राजकारण या विषयाच्या पदवी अभ्यासक्रमासाठी या पुस्तकाची खास रचना करण्यात आली आहे. सध्याच्या आंतरराष्ट्रीय राजकारणातील मुख्य संकल्पना, सिद्धान्त आणि मुद्दे यांची जाण विद्यार्थ्यांमध्ये भिनवण्यासाठी हे पुस्तक नक्कीच उपयुक्त ठरेल. विविध मान्यवर लेखकांनी योगदान दिलेले हे खंडात्मक पुस्तक वाचल्यानंतर या विषयाकडे पाहण्याचा आणि तो मांडण्याचा विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन आमूलाग्र बदलेल यात शंका नाही.

### संपादिकेविषयी

**रुमकी बसू** या सध्या नवी दिल्लीतील जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठात राज्यशास्त्राच्या प्राध्यापिका आहेत. सार्वजनिक धोरण आणि शासन, आंतरराष्ट्रीय संघटना, भारतातील विकासाचे राजकीय अर्थशास्त्र अशा विषयांवर त्यांची ८ पुस्तके आणि ३० लेख प्रकाशित झाले आहेत.

**2017 • 596 pages • PB (978-93-515-0703-1)**

₹ 695

## गुणात्मक संशोधन, 4e




हिंदीमध्ये उपलब्ध

डेव्हिड सिल्वरमन संपादित 'गुणात्मक संशोधन' हे अतिशय गाजलेले पाठ्यपुस्तक पूर्णपणे सुधारित आणि पुनरीक्षित करण्यात आले असून, त्यामुळे अधिक समग्र आणि सुगम बनले आहे. जमिनी सिद्धान्त, संशोधन नीतिमूल्ये आणि संरचनात्मक आढावा अशा महत्त्वाच्या विषयांवरील प्रकरणे नव्याने अंतर्भूत करण्यात आली आहेत.

### संपादकाविषयी

**डेव्हिड सिल्वरमन** हे लंडनमधील गोल्डस्मिथ्स महाविद्यालयात समाजशास्त्र विषयाचे मानद प्राध्यापक आहेत. सेजसाठी त्यांनी अनेक प्रचंड खपाची पुस्तके लिहिली आहेत.

**2019 • 344 pages • PB (978-93-532-8482-4)**

₹ 395

## संशोधन संरचना, 4e




### गुणात्मक, संख्यात्मक आणि मिश्र पद्धतींचे दृष्टिकोन

संशोधन संरचनेच्या एकाच पुस्तकात वाचकाला गुणात्मक, संख्यात्मक आणि मिश्र पद्धतींमध्ये तुलना करण्याची संधी मिळते. संशोधनाच्या प्रक्रियेतील सुरुवातीच्या तात्त्विक गृहीतप्रमेयांपासून ते संशोधन लेखन आणि सादरीकरणाच्या टप्प्यांदरम्यान या पद्धतींची सप्रमाण चिकित्सा आढळते.

### लेखकाविषयी

**जॉन डब्ल्यू. क्रेसवेल,** पीएच.डी. हे फॅमिली मेडिसीन विषयाचे प्राध्यापक असून, मिशिगन विद्यापीठात संमिश्र संशोधन पद्धती आणि शिष्यवृत्ती उपक्रमाचे सहसंचालक आहेत. संमिश्र संशोधन पद्धती, गुणात्मक संशोधन आणि संशोधन संरचना या विषयांमध्ये त्यांचे अनेक लेख आणि २७ पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

**2017 • 292 pages • PB (978-93-515-0697-3)**

₹ 250

## एसपीएसएसचे प्राथमिक पाठ




मानव्यविद्या, आयुर्विज्ञान, सामाजिक शास्त्रांसाठीचे हे पुरवणी पुस्तक एसपीएसएस, संख्याशास्त्र किंवा गणित यांची कोणतीही पार्श्वभूमी नसलेल्या वाचकांना एसपीएसएसची तोंडओळख करून देते. एकीकडे विषयाबाबत धास्ती कमी करून आत्मविश्वास वाढवतानाच, पॉइंट अँड क्लिक पद्धतीने शास्त्रशुद्ध संशोधनातील नेमकी उदाहरणे मांडून वाचकांना मार्गदर्शन करते आणि प्रतिकृती सादर करण्यास उद्युक्त करते.

### लेखकांविषयी

**मॅनफ्रेड ते ग्रोतेन्युईस** हे इंटरयुनिव्हर्सिटी सेंटर फॉर सोशल सायन्स थिअरी अँड मेथडॉलॉजी (आयसीएस) या संस्थेत क्वांटिटेटिव डेटा ॲनालिसिस या विषयाचे सहयोगी प्राध्यापक आहेत.
**आन्नेके मॅथिज्सेन** या रॅडबाऊड युनिव्हर्सिटीच्या स्ट्रॅटजी अँड डेव्हलपमेंट विभागात धोरणविषयक सल्लागार म्हणून कार्यरत आहेत.

**2017 • 116 pages • PB (978-93-864-4634-3)**

₹ 495

## गुणात्मक संशोधनाची कार्यपद्धती, 3e




### विद्यार्थ्यांना संशोधन-प्रक्रियेत गुंतवणे

संशोधन अभ्यास, उतारे, वैयक्तिक अनुभवाचे दाखले यांचा अंतर्भाव केल्यामुळे प्रत्येक प्रकरणात सुसंगत आणि रोचक उदाहरणे आढळतात. गुणात्मक कार्यपद्धती अभ्यासण्यासाठी विद्यार्थ्यांना हे पुस्तक वाचावेच लागेल. विद्यार्थ्यांना खरोखरच ते स्वत:हून वाचायला आवडेल. कारण उदाहरणांच्या माध्यमातून विषय समजावून घेणे त्यांना अधिक सोपे जाईल.

### लेखिकेविषयी

**शार्लीन नॅगी हेस-बिबर,** पीएचडी, चेस्टनट हिल, मॅसॅच्युसेट्स येथील बॉस्टन कॉलेजमध्ये समाजशास्त्राची प्राध्यापिका आणि स्त्री आणि लिंग अभ्यासक्रमाची संचालिका आहेत.

**2017 • 376 pages • PB (978-93-866-0221-3)**

₹ 250

## आपला पीएचडी प्रबंध कसा प्रकाशित करावा




आपला पीएचडी प्रबंध कसा प्रकाशित करावा हे विद्यार्थ्यांना त्यांचे संशोधन प्रकाशित करण्यासाठी आवश्यक असे पहिले समग्र आणि खात्रीशीर मार्गदर्शक पुस्तक आहे. मानव्यविद्या आणि सामाजिक शास्त्रांच्या विशाल आवाक्यातील विद्यार्थ्यांसाठी आणि त्यांच्या शिक्षक–मार्गदर्शकांसाठी हे पुस्तक नक्कीच उपयुक्त ठरेल.

### लेखिकेविषयी

**सारा कारो** या ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसमध्ये अर्थ आणि वित्त संपादक आहेत.

**2017 • 136 pages • PB (978-93-859-8539-3)**

₹ 595

## संशोधन पद्धती, 4e

### नवोदितांकरिता क्रमवार मार्गदर्शक




हिंदीमध्ये उपलब्ध

संशोधन किंवा संशोधन पद्धतीचा कोणताही अनुभव नसलेल्या विद्यार्थ्यांसाठी हे पुस्तक खास लिहिले गेले आहे. सामाजिक शास्त्र विषयातील पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे विद्यार्थी, ज्यांना संशोधनात रस आहे, त्यांना हे पुस्तक तंत्रे आणि उदाहरणे यशस्वीरित्या पुरवते.

### लेखकाविषयी

**रणजित कुमार** यांना ऑस्ट्रेलियातील कर्टिन युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी आणि युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया येथे ३० वर्षे अध्यापनाचा अनुभव आहे. ते सध्या युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया येथे संशोधन आणि मूल्यमापन मुक्त सल्लागार म्हणून काम करतात.

**2017 • 468 pages • PB (978-93-515-0707-9)**

₹ 250

## संशोधन प्रस्ताव विकसित करणे




हिंदीमध्ये उपलब्ध

या सहजसोप्या, माहितीपर आणि रंजक पुस्तकाद्वारे डेनिकोलो आणि बेकर तुम्हाला परिणामकारक संशोधन प्रस्ताव बनवण्याविषयी मार्गदर्शन करतात, ज्यामुळे तुम्हाला तुमच्या प्रकल्पासाठी आर्थिक साह्य मिळू शकेल किंवा एखाद्या संशोधन पदवी अभ्यासक्रमात तुम्हाला स्थान मिळू शकेल.

### लेखिकांविषयी

**पॅम डेनिकोलो** प्राध्यापक (मानद), सनदी मानसशास्त्रज्ञ, या रीडिंग विद्यापीठातून नुकत्याच निवृत्त झाल्या आहेत.
**डॉ. ल्युसिंडा बेकर** या रीडिंग विद्यापीठातील पारितोषिक विजेत्या वरिष्ठ व्याख्यात्या आणि फेलो आहेत. त्यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक पदवी आणि पदव्युत्तर संशोधन विद्यार्थ्यांना घडवले आहे.

**2017 • 160 pages • PB (978-93-859-8541-6)**

₹ 295

## तुमचे प्रबंध लिखाण, 3e




पॉल ऑलिव्हर हे यशस्वी प्रबंध पर्यवेक्षक असून, आपल्या प्रदीर्घ अनुभवाच्या जोरावर नोंदी आणि माहितीचे रूपांतर संपूर्ण पदव्युत्तर किंवा पीएच.डी. प्रबंधांमध्ये कसे करायचे याविषयी ते मार्गदर्शन करतात. हे पुस्तक तुम्हाला या संपूर्ण प्रक्रियेची एक तयार रूपरेखाच सादर करते, जिचे अनुसरण केल्यास नियोजन आणि तयारी, सैद्धान्तिक दृष्टिकोन, प्राथमिक माहिती प्रकाशन आणि तोंडी परीक्षेची तयारी या विविध टप्प्यांचा प्रवास सुलभ होईल.

### लेखकाविषयी

**पॉल ऑलिव्हर** हे शैक्षणिक लेखक आणि संशोधक आहेत. संशोधन पद्धती, शिक्षण, तत्त्वज्ञान, आणि धर्म या विषयांवर त्यांनी १९ पुस्तकांचे लेखन वा संपादन केले आहे. तब्बल सात भाषांमध्ये त्यांची पुस्तके भाषांतरित झाली आहेत. हडर्सफील्ड विद्यापीठात त्यांनी अनेक वर्षे व्याख्याता म्हणून काम पाहिले. तेथे ते डॉक्टर ऑफ एज्युकेशन अभ्यासक्रमाचे प्रमुख होते.

**2017 • 220 pages • PB (978-93-859-8542-3)**

₹ 495

# यशस्वी गुणात्मक संशोधन



हिंदीमध्ये उपलब्ध

### नवशिक्या विद्यार्थ्यांसाठी व्यावहारिक मार्गदर्शन

मूलभूत सैद्धान्तिक दृष्टिकोनांची ओळख हे पुस्तक करून देते. मग इतर दृष्टिकोनांशी तुलना आणि तफावत यांची चर्चा करते. साम्यस्थळांची ही चर्चा, कोणती पद्धती नेमकी केव्हा अनुसरावी याविषयीचे मार्गदर्शन, पॅटर्न्सच्या संदर्भात शोध घेण्याची दृष्टी अशा तिहेरी शिदोरीमुळे गुणात्मक संशोधनाच्या क्षेत्रात तुम्हाला नवीन आत्मविश्वास मिळेल.

### लेखिकांविषयी

**व्हर्जिनिया ब्राऊन** या न्यूझीलंडमधील ऑकलंड येथील ऑकलंड विद्यापीठात मानसशास्त्र विभागात सहयोगी प्राध्यापिका आहेत.
**व्हिक्टोरिया क्लार्क** या इंग्लंडमधील ब्रिस्टॉल येथील वेस्ट इंग्लंड विद्यापीठात मानसशास्त्र विभागात सहयोगी प्राध्यापिका आहेत.

**2017 • 416 pages • PB (978-93-515-0693-5)**

₹ 495

# संशोधन प्रकल्प कसा करावा याबाबतचे आवश्यक मार्गदर्शन, 2e



हिंदीमध्ये उपलब्ध

'अनभिज्ञ ते तज्ज्ञ' या प्रवासासाठी आवश्यक ज्ञान आणि कौशल्ये हे पुस्तक पुरवते. संशोधन प्रकल्पातील प्रत्येक टप्प्यावर हे पुस्तक वाचकांना अतिशय रोचक मार्गदर्शन करत राहते. प्रकल्प सुरू करण्यापासून तो लिहून काढेपर्यंत प्रत्येक टप्प्यासाठी स्वतंत्र प्रकरण सर्व शंकांचे निरसन करते.

### लेखिकेविषयी

**झीना ओ'लिअरी** या संशोधन कार्यपद्धती अभ्यासक्षेत्रातल्या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या तज्ज्ञ आहेत.

**2017 • 392 pages • PB (978-93-515-0699-7)**

₹ 595

# संख्याशास्त्राची तोंडओळख, 3e



हिंदीमध्ये उपलब्ध

विद्यार्थ्यांच्या शंकाकुशंका कमी करण्यासाठी आणि निष्कारण सूत्रांचा फापटपसारा टाळण्याच्या दृष्टीने या पुस्तकाची रचना करण्यात आली आहे. त्याचबरोबर, मूलभूत संख्याशास्त्रीय रचना आणि विश्लेषणाचा सर्वंकष आढावा या पुस्तकात घेण्यात आला आहे. संख्याशास्त्र कशा प्रकारे काम करते, याची प्रचिती या पुस्तकात देण्यात आलेल्या वास्तविक जीवनातील विविध उदाहरणांवरून येऊ शकते.

### लेखकाविषयी

**फ्रेडरिक एल. कुलीज** (पीएच.डी.) यांनी फ्लोरिडा विद्यापीठातून मानसशास्त्र विषयात बी.ए., एम.ए. आणि पीएच.डी. पूर्ण केली. त्यांनी फ्लोरिडात गेन्सविल येथील शँड्स टिचिंग हॉस्पिटलमधून चिकित्सक चेतामानसशास्त्रात (clinical neuropsychology) पोस्टडॉक्टरल पाठ्यवृत्ती पूर्ण केली. त्यांनी भारतात तीन फुलब्राइट पाठ्यवृत्तींवर काम केले आहे.

**2017 • 476 pages • PB (978-93-515-0695-9)**

₹ 400

# सामाजिक कार्यकर्त्यांसाठी कौशल्य प्रशिक्षण



हिंदीमध्ये उपलब्ध

### एक माहितीपुस्तक

हे पुस्तक सामाजिक विकास आणि समाजकार्य प्रशिक्षणाची सांगड घालते. तसेच, समाजकार्य प्रशिक्षक, व्यासंगी, विद्यार्थी यांच्याकडून नेहमी होत असलेल्या स्वतंत्र पाठ्यपुस्तकाची आणि अध्यापनसाहित्याची मागणी पूर्ण करते. समाजकार्य प्रशिक्षणासाठी एक उत्तम मार्गदर्शक असेच हे पुस्तक आहे.

### संपादकांविषयी

**सुधा दातार** या पुण्यातील कर्वे समाजसेवा संस्थेमध्ये वरिष्ठ अध्यापक होत्या.
**रुमा बावीकर** या पुण्यातील कर्वे समाजसेवा संस्थेमध्ये वरिष्ठ अध्यापक आहेत.
**गीता राव** या पुण्यातील कर्वे समाजसेवा संस्थेमध्ये वरिष्ठ व्याख्याता आहेत.
**नागमणी राव** या पुण्यातील कर्वे समाजसेवा संस्थेमध्ये अध्यापन कार्य करतात.
**उज्ज्वला मसदेकर** या पुण्यातील कर्वे समाजसेवा संस्थेमध्ये अध्यापन कार्य करतात.

**2017 • 302 pages • PB (978-93-528-0477-1)**

₹ 545

# शहरे आणि सार्वजनिक धोरण




हिंदीमध्ये उपलब्ध

## भारतीय शहरी प्राधान्यक्रम

शहरे आणि सार्वजनिक धोरण या पुस्तकात शहरांच्या आर्थिक सिद्धान्तांची उदाहरणे दिली आहेत, तसेच भारताचा नागरी कार्यक्रम विकसित करण्यासाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील नागरी व्यवस्थापनातील सर्वोत्तम प्राधान्यक्रमांचे धडे दिलेले आहेत. यात आर्थिक विकासाकरिता सार्वजनिक वित्त आणि वृद्धीला पूरक ठरू शकणारी शहरांची मध्यवर्ती भूमिका स्पष्ट केली आहे.

### लेखकाविषयी

**प्रसन्न के. मोहंती** हैदराबाद विद्यापीठात अर्थशास्त्राचे चेअर प्रोफेसर आहेत.

**2018 • 348 pages • PB (978-93-528-0959-2)**

₹ 295

# मूल्यांचे पुनरुज्जीवन




हिंदीमध्ये उपलब्ध

## नैतिक व्यवहार, विश्वासार्हता आणि सुशासन यांची गुरुकिल्ली

भारतीयांनी नैतिक राष्ट्रनिर्माण करण्याच्या दृष्टीने 'मूल्यांचे पुनरुज्जीवन' हा खंड म्हणजे आपल्या मूल्य-निद्रिस्तावस्थेला मिळालेला एक धक्का आहे. या खंडासाठी विविध क्षेत्रांतील आघाडीच्या विचारवंतांनी, धुरीणांनी लेखन केले आहे. कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायपालिकेसह समाजाच्या सर्वच क्षेत्रांत प्रामाणिक, नैतिक आणि पारदर्शी व्यवहारांचा अभाव का जाणवत आहे, याची मीमांसा हे पुस्तक करते.

### संपादकांविषयी

**ई. श्रीधरन** हे दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे प्रमुख सल्लागार आणि माजी व्यवस्थापकीय संचालक आहेत.
**भरत वख्लू** हे वख्लू ॲडव्हायजरी संस्थेचे अध्यक्ष आहेत.

**2017 • 234 pages • PB (978-93-528-0403-0)**

SAGE e-vidya

A virtual library at your fingertips!

**Read in Hindi and Marathi with our Bhasha titles with SAGE e-Vidya**

Register today for a free trial access at
**evidya@sagepub.in**

Scan to browse the list

HINDI 70+ BOOKS! | MARATHI 95+ BOOKS!

# नवीन आणि आगामी पुस्तके

## गांधी हत्येचे राजकारण

₹ 795

आर.एस.एस. आणि नथुराम गोडसे




### विवरण

महात्मा गांधींची हत्या ही केवळ भारताच्याच नव्हे तर जगाच्या इतिहासातील सर्वांत क्रूर घटनांमधील एक घटना आहे. गांधींच्या हत्येमागील कारणे, गांधीहत्येबाबत जाणीवपूर्वक प्रसारित करण्यात येणारी असत्य-अर्धसत्य माहिती, गांधीहत्येच्या कटातील आरोपींचे जातीयवादी संघटनांशी असलेले संबंध आणि नथुरामचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंध नसल्याचा संघाचा दावा, या गोष्टींचा उहापोह या पुस्तकात केला आहे.

### लेखकांविषयी

**राम पुनियानी** हे सांप्रदायिक सद्भावनेसाठीच्या अनेक उपक्रमांतील सक्रिय कार्यकर्ते आहेत.

**विवेक कोरडे** हे परिवर्तनवादी चळवळीत गेली पस्तीस वर्षे कार्यरत आहेत.

**2020 • 244 pages • PB (978-93-532-8742-9)**

## भारतातील आपत्ती व्यवस्थापन आणि प्रशासन

₹ 795




### विवरण

भारतातील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा, तिचा अभ्यास, केंद्रीय, राज्य, जिल्हा व स्थानिक पातळीवरील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा, त्यातील अधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्या, समाजाची, नागरिकांची, प्रसारमाध्यमांची, अ-शासकीय संस्थांची भूमिका, आपत्ती काळात तसेच आपत्ती पूर्व व उत्तर काळात कोणकोणत्या खबरदाऱ्या घ्याव्यात या सर्व आयामांचा सखोल अभ्यास या पुस्तकात केला आहे.

### लेखिकेविषयी

**प्रीती दिलीप पोहेकर,** राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथे लोकप्रशासन विषयाच्या सहयोगी प्राध्यापक व विभागप्रमुख आहेत.

**2020 • 296 pages • PB (978-93-532-8745-0)**

SAGE | bhasha

www.sagebhasha.com

भारतीय भाषा प्रकाशन प्रकल्प

# Love to read in Hindi and Marathi?




**Checkout the complete range of Bhasha titles**

**SHOP NOW**

# SALES INFORMATION


**Jaideep Chakravarty**
**Mob:** +91 98102 78678
**e-mail:** jaideep.chakravarty@sagepub.in

## NORTH & WEST

**Rahul Malhotra**
**Mob:** +91 98117 88266
**e-mail:** rahul.malhotra@sagepub.in

**Devashish Dhasmana**
**Mob:** +91 98188 99787
**e-mail:** devashish.dhasmana@sagepub.in

**S Shekhar Rao**
**Mob:** +91 8527700522
**e-mail:** shekhar.rao@sagepub.in

**Nikhil Verma**
**Mob:** +91 78979 97999
**e-mail:** nikhil.verma@sagepub.in

**Sunil Kumar**
**Mob:** +91 84206 89844
**e-mail:** sunil.kumar2@sagepub.in

**Chiragkumar Sureshkumar Patel**
**Mob:** +91 94294 52744
**e-mail:** chiragkumar.Patel@sagepub.in

**Dinesh Chawla**
**Mob:** +91 98113 92410
**e-mail:** dinesh.chawla1@sagepub.in

**Akash Agrawal**
**Mob:** +91 81034 66555
**e-mail:** akash.agrawal@sagepub.in

**Satya Prakash Sharma**
**Mob:** +91 9455306309
**e-mail:** satyaprakash.sharma@sagepub.in

**Vikas Pukale**
**Mob:** +91 94206 79584
**e-mail:** vikas.pukale@sagepub.in

**Alok Dube**
**Mob:** +91 98334 35804
e-mail: alok.dube@sagepub.in

## SOUTH AND EAST

**Biplab Biswas**
**Mob:** +91 98741 81444
**e-mail:** biplab.biswas@sagepub.in

**Saikat Sen**
**Mob:** +91 98308 78102
**e-mail:** saikat.sen@sagepub.in

**Prasoon Ray**
**Mob:** +91 90384 70937
**e-mail:** prasoon.ray@sagepub.in

**Rajendra Mohapatra**
**Mob:** +91 88959 97229
**e-mail:** rajendra.mohapatra@sagepub.in

**Raghavendra S**
**Mob:** +91 97403 33056
**e-mail:** Raghavendra.S@sagepub.in

**Nagarjuna K**
**Mob:** +91 92478 65355
**e-mail:** K.Nagarjuna@sagepub.in

**Umasankar M N**
**Mob:** +91 81297 88366
**e-mail:** umasankar.mn@sagepub.in

**Rajeev Ranjan Mishra**
**Mob:** +91 92644 49247
**e-mail:** rajeev.mishra@sagepub.in




SAGE | bhasha

## भारतीय भाषाओं में प्रकाशन कार्यक्रम

# हिंदी में प्रकाशित नई शोध पत्रिकाएँ




## भारतीय समाजशास्त्र समीक्षा

इंडियन सोशियोलॉजिकल सोसाइटी के सहयोग से प्रकाशित

प्रबंध संपादकः बी. के. नागला
समाजशास्त्र के पूर्व प्राध्यापक,
महर्षि दयानंद विश्वविद्यालय रोहतक, हरियाणा

प्रत्येक वर्ष 2 अंकों का प्रकाशन (जून एवं दिसंबर)
2349-1396

**bss.sagepub.in**

अपनी रचनाएँ **bnagla@yahoo.com** पर ईमेल द्वारा भेजें।

## सामाजिक विमर्श

काउंसिल फॉर सोशल डेवलपमेंट के सहयोग से प्रकाशित।

संपादकः प्रोफेसर के.एल.शर्मा
समाजशास्त्र के पूर्व प्राध्यापक,
जवाहरलाल नेहरू विश्वविद्यालय, नई दिल्ली
पूर्व कुलपति, राजस्थान विश्वविद्यालय, जयपुर

प्रत्येक वर्ष 2 अंकों का प्रकाशन (जून एवं दिसंबर)
2581-6543

**smv.sagepub.in**

अपनी रचनाएँ **samajik@csdindia.org** पर ईमेल द्वारा भेजें।




### आगामी आकर्षण !!

वर्ष 2020 से सेज इंडिया, इंडियन काउंसिल ऑफ़ वर्ल्ड अफेयर्स (आईसीडब्ल्यूए) के सहयोग से त्रैमासिक अंग्रेज़ी पत्रिका इंडिया क्वार्टरली – अ जर्नल ऑफ़ इंटरनेशनल अफेयर्स का अनुवादित संस्करण हिंदी में प्रकाशित करेगा।

**अधिक जानकारी के लिए jmarketing@sagepub.in पर लिखें!**

GUARANTEED
*prices lower than*
**amazon***

*Applicable only on sale items.

Free shipping on orders above ₹5,000

# Welcome to Steal A Deal

**stealadeal.sagepub.in**

**UP TO 70% OFF**
**ORDER NOW**

**10% off on your first order. Use code WELCOME10**

Are you a proud **bargain hunter,**
a whip-smart **money saver**
or an eagle-eyed **deal stalker**?

*De-board at the perfect destination for the bibliophile in you!*

**SHOP NOW!**




Subscribe to our monthly newsletter that aims to help you to succeed professionally with advice from our bestselling authors

* Applicable only on sale items
* Free shipping on orders above ₹5,000
* Shipping within India only

**VISIT NOW!**
**stealadeal.sagepub.in**